हिंगोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक: तालुकानिहाय अभ्यास

प्रस्तावना :-

आजच्या काळात जगातील कोणत्याही देशाच्या संदर्भात मानव विकासाची संकल्पना महत्त्वाची मानली जाते. विकासाच्या कोणत्या टप्प्यावर आपण उभे आहोत आणि इथून पुढे जाण्यासाठी आपण काम केले पाहिजे या विषयी निर्णय घेणे सुलभ व्हावे. यासाठी विविध स्तरावर मानव विकास अहवाल तयार करण्यात येत आहेत. मागील दोन दशकापूर्वी जगातील ज्या देशाचे दरडोई उत्पन्न जास्त त्या देशाचा विकास जास्त याउलट ज्या देशाचे दरडोई उत्पन्न कमी त्या देशाचा विकास कमी अशी तुलना केली जात होती. परंतु आलिकडील काळामध्ये मात्र विकासाची संकल्पना बदलून आर्थिक विकासापेक्षा मानवी विकास या घटकांशी केंद्रीभूत झाली आहे. देशाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतीक विकास हा मानवी विकासावरच अवलंबून आहे. मानवी विकास झाल्याशिवाय विकासाची संकल्पना पूर्ण झाली असे म्हणता येत नाही. उत्पन्न निर्देशांक हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशांक ठरू शकत नाही. कारण दरडोई उत्पन्नात वाढ झाल्यावर लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ व राहणीमानात सुधारणा होईपर्यंत असे निश्चित स्वरूपात सांगता येत नाही. त्यामुळे मॉरिस डी मॉरीस या अर्थतत्ज्ञाने १९८९ मध्ये सरासरी आर्युमान, बाल मृत्यूदर आणि साक्षरता हे तीन घटक विचारात घेऊन जीवनमानाचा निर्देशांक तयार केला. त्यात शिक्षण सकस आहार व स्वच्छता इत्यादीची कल्पना येते. म्हणजेच मानवी विकास हा त्याला मिळणाऱ्या सोयी सुविधावर अवलंबून असतो. १९७९ मध्ये भौतिक जीवनमानाचा निर्देशांक तयार केला पुढे सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाद्वारे जीवनमानाचा दुसरा निर्देशांक तयार करण्यात आला यालाच मानवी विकास निर्देशांक असे म्हणतात. मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना मांडण्याचे श्रेय अमर्त सेन आणि पाकिस्तानचे अर्थतज्ञ महबूब उल हक्क त्यांच्याकडे जाते. सन १९९० पासून UNDP दरवर्षी मानवी विकास अहवाल प्रकाशित करते आणि मानवी विकासाच्या विविध घटकांची चर्चा करून त्या देशांचे मानवी विकास निर्देशांकानुसार गुणानुक्रमीत करते व देशाची विभागणी अत्युच्च विकसीत देश, उच्च विकसीत

देश, मध्यम विकसीत देश आणि निम्न विकसीत देश ही वर्गवारी त्या देशातील मानव विकास निर्देशांकावरून केली जाते.

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील मानव विकासावर अवलंबून असतो. मानव विकास म्हणजे मानव भांडवल अथवा मनुष्यबळ विकास होय. आर्थिक विकास आणि मानव विकास यामध्ये धन सहसंबंध असतो. त्यामुळे आर्थिक विकास हा मानव विकासावर अवलंबून असतो. मानव भांडवलातील गुंतवणूकीच्या अभावी आर्थिक विकास मंदावतो आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानव शक्ती महत्त्वाची असते. मानव विकासाच्या आधारे विकास प्रक्रिया वृद्धीगत होऊन उत्पन्न, उपभोग आणि जीवनमानात सुधारणा होऊन आर्थिक विकासाला गती मिळते. हे जरी खरे असले तरी परंपरागत अर्थतज्ञांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानव ही संकल्पना बाजूला ठेवून यांत्रिकीकरण, औद्योगीकरण या संकल्पनेला महत्त्व दिले.

मानव विकास म्हणजे मानव कल्याणात वाढ घडवून आणणारी प्रक्रिया होय. मानव विकास म्हणजे सामाजिक, सुरक्षीतता असाही एक अर्थ अभिप्रेत आहे. सामाजिक सुरक्षीतता म्हणजे आर्थिक संकट काळात मानवाला सरंक्षणाची हमी देणे होय. मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा विस्तार करणारी प्रक्रिया होय. मानव विकास म्हणजे मूलभूत गरजांची पूर्तता होय. उच्च राहणीमान मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गरजांचा समावेश यामध्ये होतो. सकस व समतोल आहार, आरोग्य शिक्षण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोयी-सुविधा, प्रशिक्षण सोयी उत्पन्न मिळवण्यासाठी रोजगार विषयक सोयीची उपलब्धता इत्यादी घटकाचा समावेश मूलभूत गरजात होतो.

यु. एन. डी. पी. च्या मते " मानवी विकास निर्देशांक ही लोकांच्या निवडी वृद्धीगत करणारी प्रक्रिया असून ती सतत चालणारी आहे."

डॉ. सेन यांच्या मते "शिक्षण आरोग्य व रोजगार यासाठी दिलेला लढा आणि त्याची पूर्तता म्हणजे मानवी विकास होय."

डॉ. डाल्टन यांच्या मते "मानवी विकास हा आर्थिक विकास प्रक्रियेतील एक अविभाज्य घटक असून त्यासाठी शिक्षण कौशल्ये व आरोग्यविषयक विकासावर भर दिला आहे. "

हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी :-

महाराष्ट्रामध्ये मराठवाडा हा एक स्वतंत्र प्रदेश असून तो महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागापैकी एक आहे. मराठवाड्यामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद असे आठ जिल्हे आहेत. या आठ जिल्ह्यापैकी हिंगोली हा एक जिल्हा आहे. हिंगोली हा जिल्हा परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन अस्तित्वात आला आहे. प्राचीन काळात विंगुली विंग, मुल्ह, लिंगोली असा उल्लेख हिंगोलीचा आहे. हिंगोली हे तत्कालीन वाशीम जिल्ह्यातील नर्सी परगण्यातील एक गाव होते. हिंगोली येथे मुख्यत्वे निजामाने १९०३ मध्ये लष्करीतळ स्थापन केला.

आज ही हिंगोली शहरात पलटण, तोफखाना, पेंशनपुरा सदर बाजार रिसाला, अश्वशाळा, गोलंदाज गल्ली, जिनकर गल्ली इत्यादी लष्करी कालव्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या वसाहतीचा उल्लेख आढळून येतो. आज हिंगोली ही व्यापारपेठ असून जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदीरासाठी देखील प्रसिद्ध आहे. हिंगोली हे नांदेड-अकोला महामार्गावरील महत्त्वाचे ठिकाण आहे. हिंगोली जिल्हा १९.०५ उत्तर ते २०.०५ उत्तर या अक्षांशावर आणि ७६.३० पूर्व ते ७७.३० पूर्व रेखांक्षावर वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा आणि वाशीम, पूर्वेस यवतमाळ आणि नांदेड, दक्षिणेस नांदेड आणि परभणी तर पश्चिमेस परभणी आणि जालना जिल्ह्याच्या सीमा आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ४८२७ किलोमीटर असून ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत १.५७% इतके आहे.

हिंगोली जिल्ह्याचा प्रदेश हा गोदावरी खोऱ्यात येत असला तरी पैनगंगा खोऱ्यातील कयाधू व पूर्णा या उपखोऱ्यात समावेश होतो. समुद्रसपाटीपासून सर्वसाधारण उंची ५०० मी. आहे. माळहिवरा परीसरामध्ये ती ५९८ मी. पर्यंत उच्च आहे. वसमत परिसरात ती काही ठिकाणी ४०० मीटर पर्यंत खाली आहे. माळ हिवऱ्याची डोंगररांग पैनगंगा व कयाधूचे खोरे वेगळे करते. जिल्ह्यातील भूप्रदेश प्रामुख्याने नैसर्गिक घटकाचा प्रभाव घेऊन व झिजेमुळे तयार

झालेला अपखंडीत प्रदेश आहे. हा पठारी प्रदेश उच्च सखल असून त्यात नद्याची खोरी आहेत. जलप्रवाहाच्या सित्रेमुळे काही ठिकाणी गाळाच्या जमिनी तयार झाल्या आहेत. जिल्ह्याच्या सर्व भागात डेक्कन ट्रॅप या नावाने ओळखले जाणारे बेसाल्ट खडकाचे आडवे पसरलेले थर पहावयास मिळतात सामान्यतः आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे खनिजे जिल्ह्यात आढळून येत नाहीत.

सन २०११ या वर्षी झालेल्या १५ व्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ असून त्यापैकी ६०,६२९४ पुरूष तर ५७१०५१ स्त्रिया आहेत. त्याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.५० व ४८.५० टक्के एवढी आहे. हिंगोली जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ८४.८१% लोक खेड्यात राहतात तर १५.१९% लोक शहरात राहतात. जिल्ह्यात २०११ च्या जणगणनेनुसार दर हजार पुरूषा मागे ९४२ स्त्रिया आहेत.

मानव विकास आणि जग :-

संयुक्त राष्ट्र संघ विकास कार्यक्रमाच्या सन २०१८ च्या मानव विकास अहवालानुसार १८९ राष्ट्राच्या यादीत नार्वे या देशाचा प्रथम क्रमांक असून त्याचा निर्देशांक ०.९५३ इतका आहे. या क्रमावारीत भारताचा मानवी विकास निर्देशांक ०.६४० इतका आहे. १८९ राष्ट्राच्या यादीत भारताचा मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत १३० वा क्रमांक लागतो. म्हणजेच भारत मध्यविकसीत राष्ट्राच्या गटात मोडतो. सन १९९० - २०१७ या कालावधीत भारताचा मानवी विकास निर्देशांक ०.४२७ वरून ०. ६४० इतका म्हणजे ५० टक्क्यांनी वाढला आहे. परंतु भारतात आरोग्य, शिक्षण आणि जिवनमानाचा स्तर उंचावण्याच्या बाबत झालेली प्रगती अत्यंत मंद आहे.

मानव विकास निर्देशांक आणि भारत :-

सन २०१८ च्या मानव विकास अहवालानुसार भारत हे मध्यविकसीत असलेले राष्ट्र आहे. भारतात २०१८ च्या अहवालानुसार केरळ राज्याच्या मानव विकास निर्देशांक सर्वात जास्त म्हणजे ०.७८४ एवढा आहे. तर बिहार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५६६ एवढा

म्हणजेच सर्वात कमी आहे. मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत महाराष्ट्राचा भारतात नववा क्रमांक लागतो म्हणजेच महाराष्ट्राचा ०.६५९ एवढा मानव विकास निर्देशांक आहे.

मानव विकास निर्देशांक आणि महाराष्ट्र :-

महाराष्ट्र शासनाच्या २०१२ च्या मानवी विकास अहवालानुसार नंदुरबार, गडचिरोली, जालना, वाशिम, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, परभणी, धुळे हे त्या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी आहे. तर उस्मानाबाद, यवतमाळ, लातूर, बीड, गोंदीया, जळगांव, सोलापूर या जिल्ह्याचा मध्यविकसीत मानवी विकास निर्देशांक असलेले जिल्हे आहे. अहमदनगर, रत्नागिरी, अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, औरंगाबाद, नाशिक हे उच्च मानवी विकास निर्देशांक असलेले जिल्हे आहेत. सातारा, सिंधुदुर्ग, सांगली, कोल्हापूर, नागपूर, रायगड, ठाणे, पुणे, मुंबई या जिल्ह्याचा समावेश उच्च मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यामध्ये होतो. या मानव विकास निर्देशांकामध्ये हिंगोली जिल्ह्याचा ३१ वा क्रमांक आहे.

मानव विकास निर्देशांक आणि मराठवाडा :-

मराठवाड्यातील जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांकाची (२०१२ च्या मानवी विकास अहवालानुसार) तुलना केल्यास असे दिसून येते की, मराठवाडा विभागात औरंगाबाद हा एकच जिल्हा उच्च मानवी विकास निर्देशांकामध्ये येतो. तर बीड व परभणी हे जिल्हे मध्यविकासीत मानवी विकास निर्देशांकामध्ये येतात व उर्वरित हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, जालना, लातूर हे सर्वच जिल्हे कमी मानव विकास निर्देशांक असलेले जिल्हे आहेत.

अभ्यासाची आवश्यकता :-

महाराष्ट्र शासनाने सन २०१२ मध्ये केंद्रीय नियोजन मंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्र मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला आहे. या महाराष्ट्र मानव विकास अहवालामध्ये महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक स्पष्ट केला असून त्यामध्ये हिंगोली जिल्ह्याचा महाराष्ट्रातून ३१ वा क्रमांक लागतो. हिंगोली जिल्ह्याचा विकासाचा वेग हा खुपच कमी आहे. हिंगोली जिल्ह्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी

आहे. बालमृत्यूदरामध्ये देखील तालुक्यात तफावत दिसून येते.त्याचबरोबर आजपर्यंत जागतिक पातळीवर, देशपातळीवर, राज्यपातळीवर आणि जिल्हा पातळीवर तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा अभ्यास केला गेला आहे. पंरतू जिल्ह्यातील तालुक्यांची तुलना करण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा फारस उपयोग केला गेलेला नाही. त्यासाठी जिल्ह्यातील तालुक्याचा मानव विकास निर्देशांक काढून त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी हिंगोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक : तालुकानिहाय अभ्यास या संशोधन विषयाची निवड केली आहे. त्याच बरोबर संशोधनाचा उपयोग शासनाला धोरण ठरवितांना, निधीचे वाटप करताना, प्रादेशिक मागासलेपणा कमी करण्यासाठी, प्रशासनाला व अभ्यासकांना याचा उपयोग होईल यासाठी सदरील संशोधन विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक : तालुकानिहाय अभ्यास या विषयाची निवड केल्यानंतर या संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

१) मानव विकासाच्या संदर्भात त्रोटक आढावा घेणे.

२) मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांकाचा तौलनिक अभ्यास करणे.

३) हिंगोली जिल्ह्याचा तालुकानिहाय मानव विकास निर्देशांक तयार करणे.

४) हिंगोली जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचा तौलनिक अभ्यास करणे.

५) हिंगोली जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांक वाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

अभ्यासाची गृहितके :-

१) भारताच्या मानव विकास निर्देशांकात मोठी तफावत असल्याचे दिसून येते.

२) मराठवाड्याच्या मानव विकासात औरंगाबाद जिल्ह्याचा मध्यम स्वरूपाचा तर हिंगोली जिल्ह्याचा सर्वात कमी (०.६४) निर्देशांक आहे.

३) हिंगोली जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात तालुकानिहाय तफावत दिसून येते.

४) हिंगोली जिल्ह्यातील सर्वात कमी मानव विकास निर्देशांक सेनगांव तालुक्याचा निदर्शनास आला.

संशोधन पद्धती :-

सदरील अभ्यास हा द्वितीयक तसेच प्राथमिक अशा दोन्ही सामग्रीवर आधारित आहे. अभ्यासासाठी आवश्यक संदर्भग्रंथ, माहितीपत्रके, वार्षिक अहवाल जागतिक मानव विकास अहवाल अध्ययन विषयाशी निगडीत साहित्य व माहिती संकलीत करण्यात येणार असून मासिक, लेख व अंक इत्यादीचा आधार घेण्यात येणार आहे. सदरील संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक साधन सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील प्रत्येकी १०० नमुन्यांची असे एकूण ५०० नमुने यादृच्छिक पद्धतीने निवड केली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यातून १० गावाची निवड करून त्या प्रत्येक गावातून १० नमुन्याची निवड करून त्यांच्याकडून प्रश्नावली व मुलाखत अनुसुचीद्वारे माहिती जमा केली जाणार आहे.

जमा झालेल्या माहितीवर महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या मानव विकास अहवालातील सुत्राचा व चलघटकांचा अवलंब करून हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक काढून त्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

अभ्यासाच्या मर्यादा :-

तीन पैलूवर आधारित मानवी विकासाला मर्यादा आहेत. कारण त्यात फक्त तीन पैलूचाच विचार केला आहे. पर्यावरण विषयक व परिस्थितीत मुद्याचा अजिबात विचार केला जात नाही. या निर्देशांकामध्ये जगाच्या दृष्टीने विकासाचे काही नियोजन डोळ्यासमोर नाही तर फक्त राष्ट्रीय कामगिरी व क्रमवारी यावरच लक्ष केंद्रीत केले जाते. त्यामुळे देशाचा विकास जगाच्या विकासाला पुरक असेलच याची शास्वती देता येत नाही. रतनलाल बासू यांच्या म्हणण्यानुसार मानवी विकास निर्देशांक हा भौतिक बाबीवर अवलंबून आहे. त्यात नैतिक बाबीचा समावेश घेणे आवश्यक आहे. या निर्देशांकात स्त्री-पुरूष समानता राजकीय सहभाग या घटकाचा विचारच होत नाही. या मर्यादेवर मात करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रसंघ विकास

कार्यक्रमातर्फे आणखी तीन निर्देशांक दरवर्षी जाहीर होतात ते म्हणजे Gender Related Development Index, Gender Empowerment Measure आणि Human Poverty Index थोडक्यात माणसाच्या खऱ्या विकासाकडे लक्ष वेधले जावे यासाठी मानवी विकास निर्देशांक एक महत्त्वाचा टप्पा ठरतो असे म्हणता येईल.

हिंगोली जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक : एक अभ्यास सदरील संशोधन विषयाचा अभ्यास करीत असताना हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय निर्देशांक काढण्यासाठी निर्देशांक संशोधन पद्धती डोळ्यासमोर ठेवून निर्देशांक काढण्यात येणार आहेत. सदरील विषयाचा अभ्यास करताना उद्दीष्टानुरुप करणार असल्याने मानवी विकास निर्देशांकासाठी आवश्यक असणारे परिस्थिती सापेक्ष चलघटक निर्धारित करून त्या संबंधीत घटकाचाच अभ्यास केला जाणार आहे. या व्यतिरिक्त अभ्यास केला गेला नाही. म्हणून या अभ्यासाच्या मर्यादा आहेत असे म्हणता येईल.

प्रकरणाची रूपरेषा :-

सदरील संशोधन प्रबंधाची विभागणी एकूण आठ प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण १ ले :- प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण २ रे :- मानव विकासाचा आढावा

प्रकरण ३ रे :- संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ४ थे :- हिंगोली जिल्ह्याची आर्थिक स्थिती

प्रकरण ५ वे :- हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय मानवी विकास निर्देशांक

प्रकरण ६ वे :- हिंगोली जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकचा तौलनिक अभ्यास

प्रकरण ७ वी :- निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ :-

१) मिश्रा पुरी : भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, प्रकाशन, २००२, पृ.क्र. २६

२) रूद्र दत्त सुंदरम : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चान्द, ॲण्ड कंपनी लि, नई दिल्ली, २००५ पृ.क्र. ४१

३) एस.पी. सिंह : आर्थिक विकास एवं नियोजन एस. चान्द ॲण्ड कंपनी लि, नई दिल्ली, प्रकाशन, २००५ पृ.क्र. ८१

४) महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल, २०१२

५) डॉ. जोत्स्ना देशपांडे : विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळपूरे ॲण्ड कंपनी पब्लिकेशन नागपूर, २०११ पृ.क्र. १७३

६) डॉ. विजय कविमंडन : विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन २३, नवी रामदास पेठ, नागपूर, २०११ पृ.क्र. ३८२

७) हिंगोली जिल्हा सामाजिक व आर्थिक समाचोलन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१७

८) Maharashtra population census 2011

९) http://hdr.undp.org/en/2018

- संशोधक -	**- मार्गदर्शक -**
नागेश रामदास पतंगे	**डॉ. अशोक पी. टिपरसे**